प्रसिध्दी पत्रक

दिनांक : ०४/०७/२०२५

**समाजकल्याण कार्यालय, नांदेड येथील श्रीमती सुजाता पोहरे, पद–जिल्हा प्रकल्प अधिकारी यांनी जात वैद्यता प्रमाणपत्र देण्याचा मोबदला म्हणुन १५,०००/–रूपयांची लाचेची मागणी करुन लाच स्विकारल्याने लाचलुचपत प्रतिबंधक विभाग नांदेड यांचे जाळ्यात**

| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड युनिट |
|---|---|
| पोलीस ठाणे | विमानतळ जि. नांदेड |
| गुन्हा रजिस्टर नंबर | गु.र.नं २५५/२०२५ कलम ७ (अ) भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ |
| गुन्हा दाखल दिनांक व वेळ | दिनांक ०४/०७/२०२६ रोजी ०१.५६ वाजता |
| आरोपी लोकसेवक यांचे नाव, हुददा व पत्ता | सुजाता मधुकरराव पोहरे, पद – जिल्हा प्रकल्प अधिकारी (कंत्राटी), समतादुत प्रकल्प, डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (BARTI) नांदेड, रा. दत्तकृपा मंगल कार्यालय जवळ, जे–२, हडको, नांदेड. |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | ३०,०००/– रूपये |
| लाच स्विकारली रक्कम | १५,०००/– रूपये |
| थोडक्यात माहिती | यातील तक्रारदार यांनी त्यांचे मुलाचे पुढील शिक्षणासाठी अनुसूचीत जातीची जात पडताळणी होऊन वैधता प्रमाणपत्र मिळणेकामी जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती, नांदेड यांच्याकडे ऑनलाइन अर्ज केला तसेच दिनांक १३/०३/२०२५ रोजी ऑफलाइन देखील अर्ज केला होता. परंतु तो काही तांत्रिक कारणास्तव नामंजूर करण्यात आला होता.<br>तक्रारदार यांनी पुन्हा त्यांचे मुलाचे ऑनलाइन अर्ज सादर केल्यानंतर यातील आरोपी लोकसेविका सुजाता पोहरे यांची भेट घेतली. तेव्हा त्यांनी तक्रारदार यांना सांगितले की, मी काम करीत असलेल्या विभागाचे शेजारीच जात पडताळणी विभागाचे काम चालते. तेथे माझी ओळख असून मी तुझे काम करून देते. परंतु पैसे भरल्याशिवाय काम होणार नाही. तुम्ही २०,०००/– रूपये टोकन रक्कम दिल्यास तुमचे काम होईल अन्यथा काम होणार नाही अशा आशयाची तक्रार दिनांक २६/०६/२०२५ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड येथे दिली होती.<br>दिनांक ०३/०७/२०२५ रोजी समाज कल्याण कार्यालय, नांदेड परिसरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (BARTI) नांदेड येथील लोकसेविका सुजाता पोहरे यांचे कक्षात पंचासमक्ष लाचमागणी पडताळणी केली. यातील लोकसेविका यांनी तक्रारदार यांच्या मुलाची अनुसूचीत जातीची जात पडताळणी होऊन जात वैधता प्रमाणपत्र मिळवून देण्याकरीता एकूण ३०,०००/– रूपये लाचेची मागणी केली. तडजोडअंती सुरूवातीस १५,०००/– रूपये व उर्वरीत रक्कम १५,०००/– रूपये जात पडताळणी प्रमाणपत्राचे काम झाल्यानंतर द्यावे लागतील असे म्हणून लाचेची मागणी केली.<br>दिनांक ०३/०७/२०२५ रोजी समाज कल्याण कार्यालय, नांदेड परिसरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (BARTI) नांदेड येथील लोकसेविका सुजाता पोहरे यांचे कक्षात सापळा कार्यवाही आयोजित केली. लोकसेविका सुजाता पोहेरे यांनी तक्रारदार यांचेकडून लाच रक्कम १५,०००/– रूपये पंचासमक्ष स्वतः स्विकारली आहे.<br>महिला आलोसे यांना ताब्यात घेण्यात आले असुन पोलीस ठाणे विमानतळ येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. |
| मार्गदर्शक | श्री. संदीप पालवे, पोलीस अधीक्षक, डॉ. संजय तुंगार अपर पोलीस अधिक्षक, लाच लुचपत प्रतिबंधक विभाग नांदेड परीक्षेत्र नांदेड |
| पर्यवेक्षक अधिकारी | श्री. प्रशांत पवार, पोलीस उप अधीक्षक, लाच लुचपत प्रतिबंधक विभाग नांदेड |
| गुन्हयाचा तपास | श्री. करीम खान पठाण, पोलीस निरीक्षक, लाच लुचपत प्रतिबंधक विभाग नांदेड |

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबदद्ल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाशी संपर्क साधावा.

| संपर्क पत्ता :– लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड नागार्जुनसागर बिल्डील स्नेहनगर/श्रीनगर नांदेड | |
|---|---|
| संपर्क कमांक :– 02462–253512<br>टोल फी कमांक– 1064 | ऑनलाईन तकार ॲप्लीकेशन acbmaharashtra.net |
| मा. पोलीस अधीक्षक 9359056840 | पोलीस उपअधीक्षक 9359056840 |
| ई–मेल आयडी<br>spacbnanded@mahapolice.gov.in | ई–मेल आयडी<br>dyspacbnanded@mahapolice.gov.in |
| FACEBOOK – Dysp Acb Nanded | TWITTER - @ACBnanded |
| INSTAGRAM – acb nanded | |

पोलीस उपअधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड